दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

०/८

जा.क्र.माअधि/अपिल/१७/२०१९
दि.२८/०२/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्रीम.गीता जयवंत पाटील/श्रीम.मंजुळाबाई माणिक राऊत, ...............अपिलार्थी
मोर्वा, पाड्या आळी, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
उप-करनिर्धारक व संकलक (कर)

## -: विवेचन :-

श्रीम.गीता जयवंत पाटील/श्रीम.मंजुळाबाई माणिक राऊत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-करनिर्धारक व संकलक (कर) यांचेकडे दि.१०/०१/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मोर्वा येथील श्रीम.प्रभा मोतीराम भोईर यांचे नावे दाखल मालमत्ता क्र.R नविन (R030036422001), R नविन (R030036422002), R नविन (R030036422003), R नविन (R030036422004), R नविन (R030036422005) च्या मालमत्ता कर रद्द करणेबाबत आपणाकडे दि.०८/०६/२०१८ रोजी झालेल्या सुनावणीबाबत पारीत आदेशाची प्रमाणित प्रत मिळणेबाबत.
२) दि.०६/०६/२०१८ ते आजपर्यंत श्रीम.गीता जयवंत पाटील व मंजुळाबाई माणिक राऊत यांच्या दि.२८/०२/२०१६ रोजीच्या तक्रारीबाबत वरील सुनावणीतील पारीत आदेश प्रत मिळणेबाबत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१२/०२/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२८/०२/२०१९ रोजी दुपारी १२.४० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.कर/०२४/२०१९ दि.२१/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर), व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

Scanned by CamScanner

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१०/०१/२०१९ रोजीच्या पत्रानुसार माहिती प्राप्त झालेली आहे.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा उप-कर निर्धारक व संकलक (कर) यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्याने व अपिलार्थी अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान माहिती मिळाल्याचे मान्य केल्याने सदरचे अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (कर)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

O/C

**प्रति:-**

१) श्रीम.गीता जयवंत पाटील/श्रीम.मंजुळाबाई माणिक राऊत,
मोर्वा, पाड्या आळी, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०११०१.

जयवंत जगन्नाथ पाटील
Date - 2/3/2019

पोच
1/3/2019

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-कर निर्धारक व संकलक (कर)

३) सहा.जन माहिती अधिकारी तथा
कर निरिक्षक, प्रभाग क्र.२

४) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.

9/3/19

Scanned by CamScanner